भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/१२/२०१७

**१) पैश्याची बॅग चोरी. :–**

दिनांक २६/१२/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शंकर परमानंद हरसाने वय ३० वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी हे त्यांचे ऑटो मोबाईल दुकानाचे शटर्स उघडुन दुकानाचे काऊंटर वर पैश्याची बॅग ठेवली असता, दुकानाचे तिसरे शटर्स उघडण्यास गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्याची बॅग ज्यात १,६५,०००/रु. ठेवलेल्या बॅगसह चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) कौटुंबीक वादावरून काठीने डोक्यावर मारून इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक २६/१२/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले सासुरवाडीत आपले पत्नी सोबत कौटुंबीक वादावरून तोंडातोंडी भांडण सरू होते, यातील आरोपीने तुम्ही भांडण कशाला करता म्हणुन हातातील काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी प्रवीण मनोहर कावळे वय ३६ वर्ष रा. टांगा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंखी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/१२/२०१७ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर ऑटो ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकिस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.शि. लुटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/१२/२०१७ चे १९.५० ते २०.२० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिवुन दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.शि. साखरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. भोंगाडे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

४) रनींग करीत असतांना खाली पडुन तरूनाचा मृत्यु. :—

दिनांक २६/१२/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील मृतक राहुल धनराज नागरीकर वय २२ वर्ष रा. मेंढा भंडारा हा शिवाजी स्टेडीयम भंडारा येथे हॅडबॉल ग्राऊडवर रनींग करीत असतांना खाली पडुन मरण पावल्याने डॉ. मेमो व मृतकाचे सोबत असलेल्या प्रत्यक्षदर्शीय यांचे बयाना वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २६/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी, सिहोरा, व लाखनी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६२ लटर हातभट्टी दारू किंमती ४,१२०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २६/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती— १३ केसेस व ईतर वाहनांवरती —४५ केसेस करण्यात आलेले आहे.

(आर.आर. नागरे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४२१७२७१८९

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.